वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक --पोउपआ/वाह/नियो./ ५००७ /२०२३ दिनांक :- ११/०७/२०२३

**प्रेसनोट**

शिवजीनगर वाहतूक विभागाअंतर्गत सिमला चौक पासुन ते वीर चाफेकर चौक येथे मेट्रोचे पिलर उभारणेचे काम चालु होणार आहे. मेट्रो पीलर करीता वाहतुकीची एक लेन पुर्णपणे बंद करावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक सुरळीत राहणेकरीता शिवाजीनगर वाहतूक विभागातील वाहतूकीत व पार्किंगचे आदेशामध्ये बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, त्या अुनषंगाने शिवाजीनगर वाहतुक विभागाअंतर्गत विर चाफेकर चौक व परिसरातील वाहतूकीत दि. १२/०७/२०२३ रोजीपासून पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

**शिवाजीनगर वाहतूक विभागा अंतर्गत**

**१) गणेशखिंड रोड, तसेच न.ता. वाडीकडुन येणारा रस्ता तसेच फर्ग्युसन कॉलेज रोडवरुन येऊन शिवाजीनगर मुख्यालयाकडे जाणा-या (स्वतंत्र लेन) रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहतूकीस बंद करण्यात येत आहे.**

✓ **पर्यायी मार्ग**
**सिमला ऑफिस चौक यु टर्न घेवून पोलीस मुख्यालय गेट**

**२) गणेशखिंड रोडवरील सिमला ऑफिस चौक ते विर चाफेकर चौक, तसेच विर चाफेकर चौक ते सिमला ऑफिस चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना नो-पार्किंग करण्यात येत आहे.**

**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**